पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००
E.mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in

**प्रेसनोट** दिनांक : १४/०८/२०२३

# नाशिक ग्रामीण पोलीसांकडून शेतक-यांच्या तक्रारींसाठी आता 'बळीराजा' हेल्पलाईन

## *पालकमंत्री मा. ना. श्री. दादाजी भुसे यांचे हस्ते शुभारंभ*

अवैध व्यवसायांचे विरोधात कारवाई करणे सुलभ व्हावे या दृष्टीकोनातून नाशिक ग्रामीण पोलीसांनी यापूर्वी ६२६२ (२५) ६३६३ ही **'खबर'** हेल्पलाईन सुरू केली होती. सदर हेल्पलाईनचे माध्यमातून अनेक जागरूक नागरिकांनी आपापल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती पोलीसांना दिली होती. सदर हेल्पलाईन मुळे ग्रामीण पोलीसांना अवैध व्यवसायांविरुद्ध कारवाई करण्यासाठी मोठी मदत झाली होती.

जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना अनेक कामांसाठी पोलीस ठाण्यात व इतर कार्यालयामध्ये जावे लागते. ब-याचदा आपले काम नक्की कोणाकडे प्रलंबित आहे, याची माहिती देखील त्यांना मिळत नाही. परिणामी, त्यांना अकारण प्रवास खर्च सोसावा लागतो व त्यांचा बहुमूल्य वेळ देखील खर्च होतो.

सदर बाब लक्षात घेऊन नाशिक ग्रामीण पोलीसांनी शेतक-यांसाठी आता ६२६२ (७६) ६३६३ ही नवीन **'बळीराजा'** हेल्पलाईन सुरू केली आहे. आज रोजी मा. ना. श्री. दादाजी भुसे, मंत्री, सार्वजनिक बांधकाम, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नाशिक जिल्हा यांचे शुभहस्ते सदर हेल्पलाईनचा शुभारंभ करण्यात आला.

सदरवेळी मा. मंत्री महोदयांनी **'बळीराजा'** हेल्पलाईनवर पहिला कॉल करून ते शेतकरी बोलत असल्याचे सांगितले, त्याचप्रमाणे ग्रामीण पोलीसांनी सुरू केलेली ही हेल्पलाईन जिल्हयातील शेतक-यांच्या समस्या सोडवणुकीसाठी महत्त्वाची भूमिका बजावेल, अशी भावना व्यक्त करून सदर कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या.

सदरप्रसंगी मा. ना. श्री. दादाजी भुसे यांचे समवेत नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक मा. श्री. बी. जी. शेखर पाटील, पोलीस अधीक्षक श्री शहाजी उमाप, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार-कांगणे हे उपस्थित होते.

शेतक-यांच्या समस्या सोडवणुकीसाठी नाशिक ग्रामीण पोलीस दल कटिबद्ध असून, शेतकरी बांधवांनी आपल्या तक्रारी सदर हेल्पलाईनचे माध्यमातून मोकळेपणाने मांडाव्यात असे आवाहन नाशिक ग्रामीण पोलीसांतर्फे करण्यात येत आहे.